# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/12/2022 (बुधवार) सकाळ

## कोळसा चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी गजाआड

## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक १३.१२.२०२२ रोजी पोलीस स्टेशन कन्हान हददीतील मौजा गहुहिवरा रोडवर आरोपी रोहीत चौरसिया यांचे मॉ अंबे इंटरप्राईज कोल यार्ड येथे अवैधरित्या कोळशाची विक्री करित आहे. अशा मिळालेल्या माहिती नुसार स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथिल पथकाने पोलीस स्टेशन कन्हान येथील पोलीस पथकासह नमुद घटनास्थळी जावून सदरचे घटनास्थळ हे मौजा गहुहिवरा कन्हान ता. पारशिवनी रोडवरील मा अंबे इंटरप्राईज कोल यार्ड येथिल असुन सदर घटनास्थळाची पाहणी केली असता सदर यार्डमध्ये एक एलपी ट्रक क्र. MH 40 CD 5722 उभा दिसुन आला त्या ट्रकचे डाल्यात कोलयार्डमधील पाच ते सहा मजुर हे कोळसा घमेल्यांनी टाकतांनी दिसुन आले तसेच सदर यार्डमध्ये ठिकठिकाणी कोळसा पडलेला दिसुन आला यावरून सदर ट्रकचालकास त्याचे नाव, गाव, पत्ता विचारले असता त्याने अब्दुल मोहम्मद शब्बीर वय ५५ वर्ष रा. शहीद नगर न्यु. कॉलोनी रनाळा कामठी असे सांगीतले यावरून त्याला येथे येण्याचे कारण विचारले असता त्याने सांगीतले की आरोपी नामे—रोहीत चौरसिया यांचे सांगण्यावरून ट्रकमध्ये कोळसा लोड करण्याकरिता आलो आहे. तसेच यार्डचे आतील बाजुस खोली असुन त्याखोलीला लागुनच तिन कोळसा मोजण्याकरिता इलेक्ट्रॉनीक्स वनज काटे दिसुन आले. स्टॉक असलेल्या कोळश्याबाबत तेथिल हजर मजुरांना विचारपुस केली असता त्यांनी कोणतेही कागदपत्रे नसल्याचे सांगीतले तसेच त्यांनी सदर कोळसा यार्ड हा रोहीत चौरसिया याचा असल्याचे सांगीतले व त्यांना रोहीत चौरसिया यांनीच कामाकरिता रोजमजुरीने बोलाविले होते असे सांगीतले वरून रोहीत चौरसिया यांची माहीती घेवुन त्यास बोलविले असता तो कोळसा यार्डयेथे हजर आल्याने त्यास त्याचे नाव, गाव विचारले असता त्याने आपले नाव रोहीत राजकुमार चौरसिया वय २९ वर्ष रा. हवामहल टेकाडी कन्हान ता. पारशिवनी असे सांगीतले. त्यास सदर कोळसा यार्डबाबत विचारणा केली असता त्याने त्याचे यार्डमध्ये असलेल्या कोळश्याची मालकी बाबत कोणतेही अधिकृत कागदपत्रे सादर न करता उडवाउडवीची उत्तरे दिली व यार्डमध्ये असलेल्या कोळश्याबाबत कोणतेही कागदपत्र सादर केले नाही. यावरून सदर कोळसा हा वेकोली येथुन चोरून आणल्याचा संशय झाल्याने तो आरोपी रोहीत चौरसिया यांचे ताब्यातुन जप्त करून सदरचा जप्त कोळसा वेकोली येथिल टिप्पर क्र. एम.एच ४० ए.के. ४९१७ मध्ये घटनास्थळावरून लोड करून त्यामध्ये असलेल्या कोळश्याचे वेकोली येथिल धर्मकाटयावर वनज केले असता त्यात २१५३० किलो कोळसा कि. १८७३००/— रूपयाचा तसेच ट्रक MH 40 CD 5722 लोड कोळश्याचे वनज २४५२० किलो कि. २१३३२४/— रू. तसेच MH 40 CD 5722 कि. १५,०००००/— रू. व घटनास्थळावर आढळुन आलेले तिन इलेक्ट्रॉनिक वनज काटे कि. १५,०००/— रू. असा एकुन १९,१५,६२४ /— रू मुददेमाल आरोपीचे ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही नागपूर ग्रामीण जिल्हयाचे मा. पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद, मा. अपर पोलीस अधिक्षक सा. डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे स्थानिक गुन्हे शाखा नागपुर येथिल सहायक पोलीस निरीक्षक अनिल राउत स्थानिक गुन्हे शाखा .ना.ग्रा. पोलीस हवालदार विनोद काळे, नाना राउत, नरेन्द्र पटले, गजेन्द्र चौधरी, रोषन काळे पोलीस नाईक विरेन्द्र नरळ, चालक पोलीस हवालदार पाटील यांचेसह संयुक्तरित्या कायदेशिर कार्यवाही करण्यात आली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर